जा.क्र.2026/साप्र/लेखा-4/राजशिष्टाचार वाहन ई-निविदा/कावी- 34
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
दिनांक :- 29.09.2026

# महाराष्ट्र शासन
# विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
# निविदा सूचना
# (E-Tendering)

**छत्रपती संभाजीनगर** विभागातील जिल्हयांमध्ये येणा-या अति महत्वाच्या व्यक्ति (व्हि.आय.पी) / अति. अति. महत्वाच्या व्यक्ति (व्हि. व्हि. आय. पी) व मा. राज्य अतिथी यांच्या वर्दीसाठी तसेच विभागामधील इतर शासकीय कार्यालये यांचेकडे शासकीय वाहन उपलब्ध नसेल त्यावेळेस वर्दी करण्यासाठी विविध प्रकारच्या वाहनांचा पुरवठा करण्याकरिता दर करार निश्चित करण्यासाठी नोंदणीकृत भाडोत्री वाहन पुरवठादारांकडून (महाराष्ट्र राज्यामध्ये नोंदणी केलेले वाहन) दर मागविणेसाठी व न्युनतम दर (एल-1) नमूद करणा-या पुरवठादारांचे पॅनल तयार करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवित आहेत.

तपशिलवार ई-निविदा अर्ज व शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** व विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या **https://divcomcsn.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्राप्त होवू शकतील.

निविदा दिनांक 01.10.2026 रोजी दुपारी 15.00 वाजल्यापासून ते दिनांक 15.10.2026 दुपारी 12.00 वाजेपर्यंत डाउनलोड तसेच अपलोड करता येवू शकेल.

| अ.क्र. | ई-निविदा प्रक्रिया | दिनांक / वेळ |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रसिध्द होण्याची तारीख व वेळ | दिनांक 01.10.2026 दुपारी 15.00 वा. |
| 2 | ई-निविदा पूर्व बैठक | दिनांक 05.10.2026, सकाळी 11.00 वा.<br>(स्थळ :- मा. विभागीय आयुक्त,<br>छत्रपती संभाजीनगर यांच्या दालनात) |
| 3 | ई-निविदा संकेतस्थळावर जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ | दिनांक 15.10.2026, दुपारी 12.00 वा. |
| 4 | ई-निविदा उघडण्याची तारीख व वेळ | दिनांक 16.10.2026, दुपारी 16.00 वा. |
| 5 | ई-निविदा फॉर्म शुल्क रु. | रु. 50,000/- |
| 6 | ई-निविदा एकूण अंदाजित मुल्य | रु. 2,00,00,000/- (रू. दोन कोटी) |
| 7 | ई-निविदा इसारा (EMD) | रु. 6,00,000/- (रू. सहा लक्ष) |
| 8 | ई-निविदेचा वैध कालावधी | 120 दिवस |
| 9 | ई-दर कराराचा कालावधी | 2 वर्षे |

**ई-निविदेमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार तसेच सदर निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.**

(जी. श्रीकांत, भा.प्र.से)
**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

दुरध्वनी क्र. 0240-2351311

**निविदा अर्ज (Tender Form) : शुल्क रु. 50,000/- (रु. पन्नास हजार फक्त) (ना-परतावा)**

**छत्रपती संभाजीनगर** विभागातील जिल्हयांमध्ये येणा-या व्हीआयपी / व्हीव्हीआयपी व मा. राज्य अतिथी यांच्या वर्दीसाठी तसेच विभागामधील इतर शासकीय कार्यालये यांचेकडे शासकीय वाहन उपलब्ध नसेल त्यावेळेस वर्दी करण्यासाठी विविध प्रकारच्या वाहनांचा पुरवठा करण्याकरीता दर करार निश्चित करण्यासाठी नोंदणीकृत भाडोत्री वाहन पुरवठादारांकडून (महाराष्ट्र राज्यामध्ये नोंदणी केलेले वाहन) दर मागविणेसाठी व न्युनतम दर (एल-1) नमूद करणाऱ्या पुरवठादारांचे पॅनल तयार करण्यासाठी खालील तपशिलासह अर्ज मागवित आहेत :-

1) वाहनपुरवठादाराचे / भागीदाराचे / कंपनीचे नाव :

2) वाहनपुरवठादाराचे / भागीदाराचे / कंपनीचा संपर्काचा पत्ता :

3) E-Mail ID :

4) दुरध्वनी / मोबाईल क्रमांक :

5) पॅन / टॅन क्रमांक :

6) वॅट / जीएसटी क्रमांक :

7) स्वतःच्या मालकीच्या वाहनांची संख्या

(01 जानेवारी, 2023 व त्यानंतर खरेदी केलेले) :

8) केंद्र शासन / राज्य शासन यांच्याकडे एकाच वेळी

किमान 15 वाहने (T.P.) पुरवठा केल्याबाबतचे

अनुभव प्रमाणपत्र असावे :

9) बँकेचे तपशिल :

दिनांक 01.10.2026 रोजी शासनाच्या व विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या जाहिरातीतील अटी शर्ती मला मान्य आहेत.

**(निविदाधारकाचे नाव व सही)**

**पुरवठादाराने वाहने भाड्याने देण्यासंदर्भात खालील अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.**

## -:: अटी व शर्ती ::-

1) मोटार वाहन कायदा सन 1988 मधील तरतुदीप्रमाणे सर्व वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र वैध असावे व वाहनाचा कॉम्प्रेहेन्सिव्ह विमा असावा.
2) मुंबई मोटार वाहन कर कायद्याप्रमाणे वाहनाचा कर भरलेला असावा.
3) सर्व आवश्यक वाहनाची नोंदणी जानेवारी, 2023 नंतरची असावी.
4) वाहन पांढ-या रंगाचे असावे. पांढरे नसल्यास सिल्वर ग्रे रंगाचे असावे. वाहन नेहमी स्वच्छ असावे तसेच सिट कव्हर प्राधान्याने पांढरे व स्वच्छ नीटनेटके असावे. वाहनाचे टायर झिजलेले नसावेत.
5) वाहनावर मागणीप्रमाणे दुहेरी ध्वजदांडा (double flag rod) बसवलेला असावा.
6) वाहनाचे वैध P.U.C. (Pollution under Control) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
7) वाहनामध्ये 1) मिनरल वॉटर बॉटल 2) मिलटॉन गरम पाणी बाटली 3) वर्तमानपत्र (इंग्रजी व मराठी) प्रत्येकी दोन 4) फायर फायटिंग बॉटल 5) टर्किश नॅपकिन 6) टिश्श्यू पेपर बॉक्स 7) फस्ट एड बॉक्स इत्यादी असणे आवश्यक आहे.
8) निविदाधारकांच्या / कंपनीच्या नावावर किमान 10 {**5 सेडन वाहने व 5 एस. यु. व्ही. वाहने (उदा. इनोव्हा क्रिस्टा/फॉर्च्यूनर/ईर्टीगा इ.)**} वाहनांची नोंदणी टी परमिट (व्यावसायिक) म्हणून महाराष्ट्रात केलेली असावी.
9) वाहन चालकाजवळ किमान 3 वर्षाचा वाहन चालविण्याचा परवाना असावा.
10) वाहनचालकासोबत वाहन चालविण्याच्या परवान्याची मूळ प्रत व दोन छायाप्रती (Xerox), आधारकार्डची प्रत, पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक राहील.
11) वाहन पुरवठादार संस्थेकडे कार्यरत असणा-या कायम सेवेतील वाहनचालकांची 20 छायाचित्रे व वाहन चालविण्याच्या परवान्याची आणि आधारकार्डची झेरॉक्स प्रत विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे जमा करणे आवश्यक राहील.
12) कर्तव्यावर असताना वाहन चालकाची वागणूक शिस्तप्रिय आणि सौजन्याची असावी. वाहनचालकाने वाहतुकीचे नियम पाळावे. कर्तव्यावर असताना वाहन चालकाने वाहन सोडून अन्यत्र जावू नये. वाहनचालकाने दौरा कालावधीत धुम्रपान / गुटखा, तंबाखू सेवन व मद्यपान करू नये, संबंधित वाहन पुरवठादार संस्थेने संबधित वाहनचालकांचे दरवर्षी Medical Fitness Certificate घेणे अनिवार्य राहिल.
13) कर्तव्यावर पाठविण्यात येणा-या वाहनचालकाचे वर्तणूक व चारित्र्याबाबतचे गुन्हेगारी स्वरूपाचे अभिलेख नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (PCC) पोलिस विभागाकडून प्राप्त करून घ्यावेत व त्याची प्रत सादर करावी. वाहनचालकाला मराठी व हिंदी या भाषा बोलता व लिहिता येणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेचे जुजबी ज्ञान असावे.
14) वाहनचालकाकडे भ्रमणध्वनी (मोबाईल) असावा तथापि त्यांनी वाहन चालवित असताना भ्रमणध्वनीचा (मोबाईल) वापर करू नये.
15) पांढ-या रंगाचा हाफ शर्ट व त्याच रंगाची पँट आणि काळ्या रंगाचा जॅकेट / कोट व काळे बुट याप्रमाणे वाहनचालकाचा गणवेश असावा. सदर गणवेष पुरविण्याची जबाबदारी संबधित वाहन पुरवठादार संस्थेची राहील. वाहनचालकाचे राहणीमान स्वच्छ व निटनेटके असावे.
16) कर्तव्यावर असताना वाहनचालकांना नाश्ता / जेवण आवश्यकतेनुसार पुरवावे लागल्यास त्याचा खर्च वाहनपुरवठादार संस्थेने स्वतः करावा.

17) निविदेतील तक्त्यामध्ये जी.एस.टी वगळून दर नमूद करावेत. मान्यवरांच्या वर्दीच्या कालावधीत टोल व पार्किंग शुल्क अनुज्ञेय राहिल. देयकामधून आवश्यक ते सेवाशुल्क / देय कर वजाती करुन अंतिम रक्कम प्रदान करण्यात येईल.

18) वाहनाची मागणी केल्यानंतर, ठरवून दिलेल्या वेळेमध्ये सबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वाहन तपासणीकरीता पाठविण्यात यावे.

19) जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वाहनांची मागणी नोंदविल्यानंतर, अडीच तासाच्या आत सदर वाहनाची मागणी रद्द केल्यास कोणत्याही प्रकारचे भाडे देय असणार नाही.

20) जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये वाहन आल्यानंतर, संबधित वाहनाची धावसंख्या व वेळ मोजण्यात येईल. वर्दी पुर्ण झाल्यानंतर वाहन पुरवठादार संस्थेच्या कार्यालयामध्ये जाण्याकरिता जास्तीत जास्त 20 कि. मी. चे भाडे वाहनपुरवठादार संस्थेस देण्यात येईल.

21) अति महत्वाच्या व्यक्ती (व्ही.आय.पी.) / अति. अति. महत्वाच्या व्यक्ती (व्ही.व्ही.आय.पी.) यांची व कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने वर्दी पुर्ण झाल्यानंतर वाहन वापराबाबत संबधित अधिकारी यांची किंवा अति महत्चाच्या व्यक्ती (व्ही.आय.पी.) / अति. अति. महत्वाच्या व्यक्ती (व्ही.व्ही.आय.पी.) यांचे स्वीय सहाय्यक वा संपर्क अधिकारी यांची स्वाक्षरी घेवून व वाहनाची धावसंख्या नोंदवून, ड्युटी स्लिपसह कागदपत्र तात्काळ सबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जमा करावे.

22) संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने वाहनाची मागणी केल्यानंतर वाहन निर्धारित वेळेत न आल्यास 12 तास / 120 किमी एवढे निश्चित केलेले भाडे दर, दंड म्हणून वाहन पुरवठादार संस्थेस आकारण्यात येईल. सदर घटना पुन्हा घडल्यास दुप्पट दराने दंड आकारण्यात येईल. सदर घटना तिसऱ्यांदा घडल्यास अनामत रक्कम जप्त करून संस्थेची शासन स्तरावरून नोंदणी रद्द करण्यात येईल.

23) वाहन कर्तव्यावर असतांना नादुरूस्त झाल्यास एका तासाच्या आत बदली वाहन पुरविण्याची व्यवस्था वाहन पुरवठादार संस्थेची राहील, अन्यथा वाहन पुरवठादार संस्थेने पुरविलेल्या वाहनाचे त्या दिवसाचे पूर्ण भाडे अदा केले जाणार नाही.

24) वाहन कर्तव्यावर असतांना अपघात झाल्यास व त्यामुळे वाहनाचा चालक व वाहनामधील मान्यवरांस इजा/दुखापत/मृत्यू झाल्यास किंवा त्याअनुषंगाने होणारा संपूर्ण खर्च/नुकसान भरपाई पुरवठादार संस्थेस सोसावी लागेल. या संदर्भात कोणतेही देणी / मा. न्यायालयीन प्रकरणास शासन जबाबदार राहणार नाही. थर्ड पार्टी विमा अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी वाहन पुरवठादार संस्थेची राहील.

25) जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या मागणी प्रमाणे वाहन पुरवठादार संस्थेने वाहनाचा पुरवठा न केल्यास अथवा निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास वाहन पुरवठादार संस्थेला 15 दिवसांची पूर्वसूचना देऊन कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

26) निविदेचा कालावधी जास्तीत जास्त 2 वर्षे राहील कालावधी इंधन दरवाढ किंवा कोणत्याही कारणास्तव दरांमध्ये वाढ होणार असल्यास, ती वाढ वाहन पुरवठादार संस्थेस अनुज्ञेय राहणार नाही.

27) यशस्वी निविदाधारकास निविदा स्विकृतीचे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत रूपये 6,00,000 /-(रूपये सहा लक्ष फक्त) बिगरव्याजी सुरक्षा ठेव (बँक गॅरेंटी) विभागीय आयुक्त कार्यालयाकडे जमा करावी लागेल. (सदरील रक्कम खरेदी धोरणाप्रमाणे निश्चित करण्यात यावी.)

28) निविदाधारकास देयकाच्या रक्कमेतून नियमानुसार अनुज्ञेय होणार वस्तु व सेवा कर (जीएसटी) व त्यावरील अधिभार व इतरअनुज्ञेय प्रचलित कर वसूल करून उर्वरित देयकाची रक्कम वाहन पुरवठादार संस्थेस अदा करण्यात येईल.

29) कोणतीही किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार शासनाकडे राहील.

30) वाहन पुरवठादार संस्थेच्या देयकाचे प्रदान फक्त ECS / NEFT द्वारे कोर बँकिंग सुविधा असलेल्या बँकेतच केले जाईल. त्यासाठी Core Banking ची सुविधा असलेल्या बँकेतच खाते उघडणे बंधनकारक राहिल.

31) ई-निविदा भरताना कोणतीही टंकलिखीत चूक झाल्यास, त्यांनतर सादर केलेल्या ई-निविदेतील तपशिलामध्ये कोणतीही सुधारणा मान्य केली जाणार नाही. वित्तिय दर हे सर्व निविदाकारांनी कागदपत्रांची तपासणी करून काळजीपूर्वक नमूद करावेत त्यात बदल / सुधारणा करण्याची संधी दिली जाणार नाही.

32) उद्योग विभागाच्या दिनांक 01.12.2016 रोजीच्या खरेदी धोरणातील परिच्छेद क्रमांक 3.1.2.1 नुसार, निविदेच्या इष्टतम स्पर्धेला बाधा येवू नये म्हणून निविदेतील कोणत्याही बाबीकरिता बाजारभावापेक्षा/वाजवीपेक्षा कमी दर नमूद करू नयेत. वित्तिय दर सादर करतांना निविदेतील कोणत्याही बाबीकरीता शुन्य दर नमूद केल्यास वा कोणत्याही बाबीचा रकाना "निरंक" ठेवल्यास सदरची निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. अशा प्रकारे शुन्य दर नमूद करणाऱ्या तसेच कोणत्याही बाबीचा रकाना "निरंक" ठेवणाऱ्या निविदाधारकास अपात्र ठरविण्यात येईल.

33) निविदाधारकांकडे स्वतःच्या मालकीची (Ownership of Vehicles) / वाहन पुरवठादार संस्थेच्या नावे किमान 10 वाहने {5 सेडान व 5 एसयूव्ही वाहने, (उदा. इनोव्हा क्रिस्टा/फॉर्च्युनर/ईर्टीगा इ.)} व्यावसायिक परवान्याची (Transport Permit) असावीत. अशी वाहने निविदाधारकांच्या स्वतःच्या किंवा वाहन पुरवठादार संस्थेच्या नावे असल्याचा पुरावा म्हणून प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे व (RC) आरसी बुक झेरॉक्स तांत्रिक लिफाफ्यासोबत सादर करावे.

34) सोबतच्या नमुना करारपत्राप्रमाणे यशस्वी निविदाधारकास विभागीय आयुक्त यांच्यासोबत करारनामा करणे बंधनकारक राहील.

35) या ई-निविदेसंदर्भातील किंवा दर करारा संदर्भातील उद्भवणारे कोणतेही दावे अथवा मा. न्यायालयीन प्रकरणे सक्षम मा. न्यायाधिकरणामध्ये चालविता येतील.

36) वाहन पुरविण्यासाठी निविदाकाराची अंतिम निवड करण्याचे अधिकार शासनाचा राहील.

37) निविदाधारक / वाहन पुरवठादार संस्था यांच्या विरोधात कोणत्याही मा. न्यायालयामध्ये, किंवा कोणत्याही पोलीस ठाण्यात कोणताही खटला प्रलंबित नाही, याबाबतचे प्रतिज्ञापत्र (Affidavit) तांत्रिक लिफाफ्यासोबत जोडण्यात यावे.

38) अति महत्वाच्या व्यक्ती (व्ही.आय.पी.) व अति. अति. महत्वाच्या व्यक्ती (व्ही.व्ही.आय.पी.) यांचा दौरा एका दिवसापेक्षा जास्त कालावधीकरिता असेल, त्यावेळी प्रत्येक वाहनाकरीता 2 वाहनचालक उपलब्ध करून देणे, वाहन पुरवठादार संस्थेवर बंधनकारक राहिल.

39) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2026/प्र.क्र.06/2026/कोषा प्रशा-5, दिनांक 06.02.2026 अन्वये निश्चित केल्यानुसार शासकीय कार्यालयांकडून वापरण्यात येणाऱ्या कंत्राटी सेवेच्या वाहनावर, वाहतुक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे कोणताही वाहतूक दंड प्रलंबित नाही, असे प्रमाणपत्र देयक सादर करताना लिफाफ्यासह उपलब्ध करून देणे अनिवार्य राहील.

40) निविदेत न्युनतम दर (एल-1) नमूद करणाऱ्या पॅनलमधील पुरवठाधारकाकडून निविदा मूल्याच्या किमान 50% देयकाची रक्कम होईल, इतकी रकमेची वाहने प्राथम्याने भाड्याने घेण्यात येतील व तेवढी वाहने पुरविण्याबाबत एल-1 पुरवठाधारकाकडे मागणी करण्यात येईल. उर्वरित वाहने पॅनलमधील अन्य पुरवठादारांकडून घेण्यात येतील. मात्र, न्युनतम दरधारक (एल-1) यांनी त्यांच्याकडे मागणी केलेली वाहने पुरविण्यास नकार दिल्यास, त्या वाहनाकरिता निविदेत निश्चित केलेल्या भाड्याची रक्कम जितकी होईल, त्या रकमेचा उपरोल्लेखित 50% देयकांमध्ये समावेश होईल व अशाप्रकारे 50% देयकांच्या रकमेची गणना करण्यात येईल. (उदा. निविदा मूल्य रू. 3.00 कोटी असेल त्यावेळी न्युनतम दरधारकांकडून किमान रू. 1.50 कोटी देयकाची रक्कम होईल इतक्या रकमेची वाहने भाड्याने घेण्यात येतील. उर्वरित रकमेची वाहने पॅनलमधील अन्य पुरवठादारांकडून घेण्यात येतील. मात्र, न्युनतम दर नमूद करणाऱ्या पुरवठादाराने वाहने पुरविण्यास

नकार दिल्यास त्या वाहनांकरिता निश्चित केलेल्या भाड्याची संभाव्य रक्कम रूपये 5.00 लाख होणार असेल तर या संभाव्य रू. 5.00 लाख इतक्या रक्कमेचा रू. 1.50 कोटी रकमेमध्ये समावेश असेल.)

41) ज्या जिल्ह्यामध्ये मा. राज्य अतिथी यांचा दौरा असेल, अशा जिल्ह्यातील पुरवठादार पॅनलवर नसल्यास किंवा जिल्ह्यातील पुरवठादाराकडे योग्य वाहन उपलब्ध नसल्यास किंवा त्याने वाहन पुरविण्यास असमर्थता दर्शविल्यास किंवा आपात्कालीन परिस्थिती उद्भवल्यास मा. राज्य अतिथी यांच्या वर्दीसाठी नजिकच्या जिल्ह्यातील पॅनलमधील वाहन पुरवठादाराकडून भाड्याने वाहने घेण्यात येतील.

42) संपर्क ई-मेल आयडी :- abdprotocol@gmail.com

# निविदा सादर करण्याची कार्यपध्दती

निविदा दोन लिफाफा पद्धतीनुसार भरावयाची असून दोन स्वतंत्र **तांत्रिक व वाणिज्य** या प्रमाणे वेगवेगळ्या प्रकारे ई-निविदेवर माहिती भरावयाची आहे.

## 1. तांत्रिक निविदेचा लिफाफ्यामध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे ठेवण्यात यावीत:-

अ) ई-निविदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे पात्रता निर्धारणाबाबतचे सर्व दस्तऐवज ठेवावेत. जोडण्यात येणाऱ्या प्रत्येक दस्तऐवजावर निविदाधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

ब) इसाऱ्याची अनामत रक्कम रूपये 6,00,000/- ई-निविदा फॉर्म शुल्क रु. 50,000/-
विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या नावे ऑनलाईन भरावे व त्याची झेरॉक्स प्रत सोबत ठेवण्यात यावी.

क) नोंदणी प्रमाणपत्र :- दुकाने व आस्थापना अधिनियमाखाली व्यवसायाची नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. तसेच उद्योग, आधार नोंदणी प्रमाणपत्र, GST नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, PAN कार्डच्या झेरॉक्स प्रती सोबत जोडाव्यात.

ड) राष्ट्रीय लघु उद्योग लि. यांचेकडील व्यवसाय नोंदणी केल्याचे स्टार्टअप (लघु उद्योग) प्रमाणपत्र असल्यास नोंदणी शुल्क भरण्यास नियमानुसार सुट असेल. तथापि, राष्ट्रीय लघु उद्योग मंडळाचे प्रमाणपत्राची प्रत जोडणे बंधनकारक राहील.

इ) आयकर प्रमाणपत्र :- (सन 2022-23, 2023-24 आणि 2024-25) या 3 वर्षाचा आयकर व GST भरल्याचा पुरावा (रिटर्न्सचे झेरॉक्स) तसेच मागील 3 वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल किमान **रू. 1,50,00,000/- (रूपये एक कोटी पन्नास लक्ष)** असल्याचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.
(विभागीय आयुक्त यांनी वार्षिक उलाढाल रक्कम दि. 01.12.2016 च्या खरेदी धोरणाप्रमाणे निश्चित करावी.)

ई) व्यवसाय अनुभव प्रमाणपत्र :- परिवहन क्षेत्रात उत्तम काम केल्याबाबतचा मागील 5 वर्षांचा अनुभव असावा. त्यानुसार केंद्र शासन / राज्य शासन यांच्याकडे एकाच वेळी किमान 15 वाहने (T.P.) पुरवठा केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र असावे.

उ) स्वतःच्या मालकीची किंवा स्वत:च्या वाहन पुरवठादार संस्थेच्या नावे टी-परमिट असलेली व त्यांची महाराष्ट्रात नोंदणी केलेली किमान 10 वाहने **{5 सेडन वाहने व 5 एस. यु. व्ही. वाहने (उदा. इनोव्हा क्रिस्टा/फॉर्च्यूनर/ईर्टीगा इ.)}** असावीत. पुरावा म्हणून आर.सी./टी.सी. पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती सादर कराव्यात. जानेवारी, 2023 किंवा त्यानंतर खरेदी केलेल्या वाहनांचा तपशील खालील तक्त्यात नमूद करावा.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | खरेदी वर्ष | वाहन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

ऊ) मोटार वाहन कायदा सन 1988 मधील तरतुदीप्रमाणे किमान 10 वाहनांची वैध योग्यता प्रमाणपत्र (Fitness) व वाहनाचा थर्ड पार्टी विमा काढण्यात आल्याचे कागदपत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील.

ऋ) मुंबई मोटार वाहन कर कायद्याप्रमाणे वाहनाचे सर्व कर भरलेल्याची कागदपत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील.

ऌ) निविदाधारक / वाहन पुरवठादार संस्था यांच्या विरोधात कोणत्याही मा. न्यायालयामध्ये, किंवा कोणत्याही पोलीस ठाण्यात कोणताही खटला प्रलंबीत नाही, याबाबतचे प्रतिज्ञापत्र (Affidavit) जोडण्यात यावे.

२. वाणिज्य / दरासंबंधीचा लिफाफा :-

**Bill of Quantity (As per enclosure)**

**Note :-**

1. **This BOQ template must not be modified / replaced by the bidder and the same should be uploaded after filling the relevant columns, else the bidder is liable to be rejected for this tender.**
2. **Bidders are allowed to tender the Bidder Name and Values only.**
3. **The rate to be quoted in Column no. 7 is for the extra per-hour rate, in the case where the vehicle has to wait for more period than the particular hours slab, and the same thing for extra km, i.e., Column no. 8 (example, if a vehicle is used for 10 hours & 100 km (will be considered in 8 hours / 80 km slab) the extra k.m. will be 20 k.m. and extra hours will be 2 hours to be charged).**
4. **The L-1 (Lowest quoted) rates will be finalized after a comparative analysis of the rates submitted by the vehicle service providers (bidders). Bidder who quotes the L-1 rate will be considered.**
5. **The Government reserves the right to accept or reject any or all tenders without assigning any reason.**
6. **The rates should be mentioned in the same column as the type of vehicle for which the rates are to be paid. If the amount is mentioned as zero or less than the reasonable market price, those rates will not be accepted and the bidder will not be considered for the supply of any type of vehicle. The bidder will be disqualified from the E-Tendering process.**

(जी. श्रीकांत, भा.प्र.से)

**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

वर नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**(निविदाधारकाचे नाव व सही)**

## विवरणपत्र - व्यापारी लिफाफा
## भाडोत्री वाहने पुरविण्याचे दर दर्शविणारा तक्ता (सर्व करांव्यतिरिक्त)

(रक्कम रूपयात)

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | ८ तास / ८० कि.मी. करीता दर | १२ तास / १२० कि.मी. करीता दर | २४ तास / ३०० कि.मी. करीता दर | बाहेर गावी २४ तास / ३०० कि.मी. करीता दर | ८/१२/२४ तासांपुढील प्रत्येक तासकरीता दर | ८०/१२०/ ३०० कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी. करीता दर | बाहेरगावी ३०० कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी. दर | प्रति मासिक ३००० कि.मी. आणि ३०० तासां करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1. | मर्सिडीज बेंझ (एस-क्लास) | | | | | | | | |
| 2. | मर्सिडीज बेंझ (ई-क्लास) | | | | | | | | |
| 3. | बी. एम. डब्ल्यू (सेव्हन सिरीज) | | | | | | | | |
| 4. | टोयोटा वेलफेअर | | | | | | | | |
| 5. | टोयोटा फॉर्च्यूनर/कॅमरी | | | | | | | | |
| 6. | टोयोटा इनोव्हा हायक्रॉस | | | | | | | | |
| 7. | टोयोटा इनोव्हा क्रिस्टा | | | | | | | | |
| 8. | होंडा सिटी / मारूती सियाझ | | | | | | | | |
| 9. | होंडा अमेझ / स्विफ्ट डिझायर | | | | | | | | |
| 10. | ईर्टिगा / बोलेरो / स्कॉर्पिओ | | | | | | | | |
| 11. | टेम्पो ट्रॅव्हलर (१३ सिटर-ए.सी.) | | | | | | | | |
| 12. | टेम्पो ट्रॅव्हलर (२० सिटर-ए.सी.) | | | | | | | | |
| 13. | अरबानिया (१७ सिटर-ए.सी.) | | | | | | | | |
| 14. | बस (३५ सिटर-ए.सी.) | | | | | | | | |
| 15. | ओपन जीप - मिडिया कार | | | | | | | | |
| 16. | लगेज कन्टेनर / लगेज व्हॅन | | | | | | | | |

भाडोत्री <u>ईलेक्ट्रीक वाहने</u> पुरविण्याचे दर दर्शविणारा तक्ता (सर्व करांव्यतिरिक्त)

(रक्कम रूपयात)

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | ८ तास / ८० कि.मी. करीता दर | १२ तास / १२० कि.मी. करीता दर | २४ तास / ३०० कि.मी. करीता दर | बाहेर गावी २४ तास / ३०० कि.मी. करीता दर | ८/१२/२४ तासांपुढील प्रत्येक तासकरीता दर | ८०/१२०/३०० कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी. करीता दर | बाहेरगावी ३०० कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी. दर | प्रति मासिक ३००० कि.मी. आणि ३०० तासां करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 17. | मर्सिडीज बेंझ (एस-क्लास) | | | | | | | | |
| 18. | मर्सिडीज बेंझ (ई-क्लास) | | | | | | | | |
| 19. | बी. एम. डब्ल्यू (सेव्हन सिरीज) | | | | | | | | |
| 20. | टोयोटा वेलफेअर | | | | | | | | |
| 21. | बस (३५ सिटर-ए.सी.) | | | | | | | | |
| 22. | ओपन जीप - मिडिया कार | | | | | | | | |

## निविदाधारकांनी निविदेसोबत निम्नलिखीत प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| **(अ) किमान पात्रता निर्धारण :-**<br>**1) इसारा रक्कम :-** | विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे नावे ऑनलाईन पेमेंट करावे. |
| **2) ई-निविदा फॉर्म शुल्क** | रूपये 50,000/- ऑनलाईन भरावे. |
| **3) नोंदणी प्रमाणपत्र :-** | दुकाने व आस्थापना अधिनियमाखाली व्यवसायाची नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र, GST नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, PAN च्या झेरॉक्स प्रती सोबत जोडाव्यात. |
| **4) आयकर प्रमाणपत्र :-** | (सन 2022-23, 2023-24 आणि 2024-25) या 3 वर्षाचा आयकर भरल्याबाबत त्याच्या झेरॉक्स प्रती सोबत जोडाव्यात. |
| **5) सनदी लेखापाल उलाढाल प्रमाणपत्र :-** | निविदाधारकाने मागील 3 वर्षामध्ये सरासरी आर्थिक उलाढाल किमान रू. 1,50,00,000/- **(रूपये एक कोटी पन्नास लक्ष फक्त)** असल्याबाबतचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र जोडावे. |
| **6) व्यवसाय अनुभव प्रमाणपत्र :-** | केंद्र शासन / राज्य शासन यांच्याकडे एकाच वेळी किमान 15 वाहने (T.P.) पुरवठा केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र असावे. |
| **7) मालकीची वाहने आणि परिवहन क्षमता :-** | निविदाधारकांकडे स्वतःच्या मालकीची (Ownership of vehicles) / वाहन पुरवठादार संस्थेच्या नावे किमान 10 वाहने {5 सेडन वाहने व 5 एस. यु. व्ही. वाहने (उदा. इनोव्हा क्रिस्टा/फॉर्च्युनर/ईर्टीगा इ.)} व्यावसायिक परवान्याची (Transport Permit) असावीत. अशी वाहने निविदाधारकांच्या स्वतःच्या किंवा वाहनपुरवठादार संस्थेच्या नावे असल्याचा पुरावा म्हणून प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे RC बुकची झेरॉक्स प्रत, वाहनाचा कॉम्प्रेहेन्सिव्ह विमा भरल्याची पावती तसेच मुंबई मोटार वाहन कर कायद्याप्रमाणे वाहनांचा कर भरल्याबाबतची कागदपत्र. |

# नमुना करार पत्र

करार लिहून देणार :-

---------------------------------------

करार लिहून घेणार :-

**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये येणा-या अति महत्वाच्या व्यक्ति (व्हि.आय.पी) / अति. अति. महत्वाच्या व्यक्ति (व्हि. व्हि.आय.पी) व मा. राज्य अतिथी यांच्या वर्दीसाठी तसेच विभागामधील इतर शासकीय कार्यालयांना भाडोत्री वाहन पुरवठा करण्याकरिता मी निविदा सादर केली होती. आमचे दर करार स्विकृत करण्यात येवून वाहन पुरवठा करण्याकरिता निवड करण्यात आली आहे त्यानुसार भाडोत्री वाहन पुरवठा करण्याकरिता मी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याशी हा करार दिनांक ------------ रोजी करण्यात येत आहे.

या करारान्वये मी खालील अटी व शर्ती पाळण्यास बांधील राहीन/राहू.

**:: अटी व शर्ती ::**

१) मोटार वाहन कायदा सन १९८८ मधील तरतुदीप्रमाणे सर्व वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र वैध असावे व वाहनाचा कॉम्प्रेहेन्सिव्ह विमा असावा.

२) मुंबई मोटार वाहन कर कायद्याप्रमाणे वाहनाचा कर भरलेला असावा.

३) सर्व आवश्यक वाहनाची नोंदणी जानेवारी, २०२३ नंतरची असावी.

४) वाहन पांढ-या रंगाचे असावे. पांढरे नसल्यास सिल्वर ग्रे रंगाचे असावे. वाहन नेहमी स्वच्छ असावे तसेच सिट कव्हर प्राधान्याने पांढरे व स्वच्छ नीटनेटके असावे. वाहनाचे टायर झिजलेले नसावेत.

५) वाहनावर मागणीप्रमाणे दुहेरी ध्वजदांडा (double flag rod) बसवलेला असावा.

६) वाहनाचे वैध P.U.C. (Pollution Under Control) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

७) वाहनामध्ये १) मिनरल वॉटर बॉटल २) मिलटॉन गरम पाणी बाटली ३) वर्तमानपत्र (इंग्रजी व मराठी) प्रत्येकी दोन ४) फायर फायटिंग बॉटल ५) टर्किश नॅपकिन ६) टिश्श्यू पेपर बॉक्स ७) फस्ट एड बॉक्स इत्यादी असणे आवश्यक आहे.

८) निविदाधारकांच्या / कंपनीच्या नावावर किमान १० (५ सेडन वाहने व ५ एस. यु. व्ही. वाहने (उदा. इनोव्हा क्रिस्टा/फॉर्च्यूनर/ईर्टीगा इ.)} वाहनांची नोंदणी टी परमिट (व्यावसायिक) म्हणून महाराष्ट्रात केलेली असावी.

९) वाहन चालकाजवळ किमान ३ वर्षाचा वाहन चालविण्याचा परवाना असावा.

१०) वाहनचालकासोबत वाहन चालविण्याच्या परवान्याची मूळ प्रत व दोन छायाप्रती (Xerox), आधारकार्डची प्रत, पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक राहील.

११) वाहन पुरवठादार संस्थेकडे कार्यरत असणा-या कायम सेवेतील वाहनचालकांची २० छायाचित्रे व वाहन चालविण्याच्या परवान्याची आणि आधारकार्डची झेरॉक्स प्रत विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे जमा करणे आवश्यक राहील.

१२) कर्तव्यावर असताना वाहन चालकाची वागणूक शिस्तप्रिय आणि सौजन्याची असावी. वाहनचालकाने वाहतुकीचे नियम पाळावे. कर्तव्यावर असताना वाहन चालकाने वाहन सोडून

अन्यत्र जावू नये. वाहनचालकाने दौरा कालावधीत धुम्रपान/गुटखा, तंबाखू सेवन व मद्यपान करू नये. संबंधित वाहन पुरवठादार संस्थेने संबधित वाहनचालकांचे दरवर्षी Medical Fitness Certificate घेणे अनिवार्य राहिल.

१३) कर्तव्यावर पाठविण्यात येणा-या वाहनचालकाचे वर्तणूक व चारित्र्याबाबतचे गुन्हेगारी स्वरूपाचे अभिलेख नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (PCC) पोलिस विभागाकडून प्राप्त करून घ्यावेत व त्याची प्रत सादर करावी. वाहनचालकाला मराठी व हिंदी या भाषा बोलता व लिहिता येणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेचे जुजबी ज्ञान असावे.

१४) वाहनचालकाकडे भ्रमणध्वनी (मोबाईल) असावा तथापि त्यांनी वाहन चालवित असताना भ्रमणध्वनीचा (मोबाईल) वापर करू नये.

१५) पांढ-या रंगाचा हाफ शर्ट व त्याच रंगाची पॅट आणि काळ्या रंगाचा जॅकेट/कोट व काळे बुट याप्रमाणे वाहनचालकाचा गणवेश असावा. सदर गणवेष पुरविण्याची जबाबदारी संबधित वाहन पुरवठादार संस्थेची राहील. वाहनचालकाचे राहणीमान स्वच्छ व निटनेटके असावे.

१६) कर्तव्यावर असताना वाहनचालकांना नाश्ता/जेवण आवश्यकतेनुसार पुरवावे लागल्यास त्याचा खर्च वाहनपुरवठादार संस्थेने स्वतः करावा.

१७) निविदेतील तक्त्यामध्ये जी.एस.टी वगळून दर नमूद करावेत. मान्यवरांच्या वर्दीच्या कालावधीत टोल व पार्किंग शुल्क अनुज्ञेय राहिल. देयकामधून आवश्यक ते सेवाशुल्क / देय कर वजाती करुन अंतिम रक्कम प्रदान करण्यात येईल.

१८) वाहनाची मागणी केल्यानंतर, ठरवून दिलेल्या वेळेमध्ये सबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वाहन तपासणीकरीता पाठविण्यात यावे.

१९) जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वाहनांची मागणी नोंदविल्यानंतर, अडीच तासाच्या आत सदर वाहनाची मागणी रद्द केल्यास कोणत्याही प्रकारचे भाडे देय असणार नाही.

२०) जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये वाहन आल्यानंतर, संबधित वाहनाची धावसंख्या व वेळ मोजण्यात येईल. वर्दी पुर्ण झाल्यानंतर वाहन पुरवठादार संस्थेच्या कार्यालयामध्ये जाण्याकरिता जास्तीत जास्त २० कि. मी. चे भाडे वाहनपुरवठादार संस्थेस देण्यात येईल.

२१) अति महत्वाच्या व्यक्ति (व्हि. आय. पी) / अति. अति. महत्वाच्या व्यक्ति (व्हि. व्हि. आय. पी) यांची व कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने वर्दी पुर्ण झाल्यानंतर वाहन वापराबाबत संबधित अधिकारी यांची किंवा अति महत्वाच्या व्यक्ति (व्हि.आय.पी) व अति. अति. महत्वाच्या व्यक्ति (व्हि. व्हि.आय.पी) यांचे स्वीय सहाय्यक वा संपर्क अधिकारी यांची स्वाक्षरी घेवून व वाहनाची धावसंख्या नोंदवून, ड्युटी स्लिप सह कागदपत्र तात्काळ सबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जमा करावे.

२२) सबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने वाहनाची मागणी केल्यानंतर वाहन निर्धारित वेळेत न आल्यास मागणी केलेल्या वाहनाच्या बारा तास/एकशेवीस किलो मीटर एवढे निश्चित केलेले भाडे दर, दंड म्हणून वाहनपुरवठादार संस्थेस आकारण्यात येईल. सदर घटना पुन्हा घडल्यास दुप्पट दराने दंड आकारण्यात येईल. सदर घटना तिस-यांदा घडल्यास अनामत रक्कम जप्त करुन संस्थेची शासन स्तरावरून नोंदणी रद्द करण्यात येईल.

२३) वाहन कर्तव्यावर असताना नादुरूस्त झाल्यास एका तासाच्या आत बदली वाहन पुरविण्याची व्यवस्था वाहनपुरवठादार संस्थेची राहील, अन्यथा वाहनपुरवठादार संस्थेने पुरविलेल्या वाहनाचे त्या दिवसाचे पुर्ण भाडे अदा करण्यात येणार नाही.

२४) वाहन कर्तव्यावर असताना अपघात झाल्यास व त्यामुळे वाहनाचा चालक व वाहनामधील मान्यवरांस इजा/दुखापत / मृत्यु झाल्यास किंवा त्या अनुषंगाने होणारा संपूर्ण खर्च/नुकसान भरपाई वाहनपुरवठादार संस्थेस सोसावा लागेल. यांसदर्भात कोणतेही देणी / मा. न्यायालयीन प्रकरणास शासन जबाबदार राहणार नाही. थर्ड पार्टी विमा अद्ययावत ठेवण्याची जवाबदारी वाहन पुरवठादार संस्थेची राहील.

२५) जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या मागणीप्रमाणे वाहन पुरवठादार संस्थेने वाहनाचा पुरवठा न केल्यास अथवा निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास वाहन पुरवठादार संस्थेला पंधरा दिवसाची पूर्वसूचना देवून कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२६) निविदेचा कालावधी जास्तीत जास्त दोन वर्षे राहिल. या कालावधीमध्ये इंधन दरवाढ वा अन्य कोणत्याही कारणास्तव दरांमध्ये वाढ होणार असल्यास, ती वाढ वाहनपुरवठादार संस्थेस अनुज्ञेय राहणार नाही.

२७) यशस्वी निविदाधारकास निविदा स्विकृतीचे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत **6,00,000 रूपये/- (रूपये सहा लक्ष फक्त)** बिगर व्याजी सुरक्षा ठेव बँक गॅरेंटी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे जमा करावी लागेल. (सदरील रक्कम खरेदी धोरणाप्रमाणे निश्चित करण्यात यावी.)

२८) निविदाधारकास देयकाच्या रक्कमेतून नियमानुसार अनुज्ञेय होणारा वस्तु व सेवा कर व त्यावरील अधिभार व इतर अनुज्ञेय प्रचलित कर वसूल करून उर्वरित देयकांची रक्कम वाहनपुरवठादार संस्थेस अदा करण्यात येईल.

२९) कोणतीही किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार शासनाकडे राहील.

३०) वाहन पुरवठादार संस्थेच्या देयकाचे प्रदान फक्त ईसीएस / एनईएफटी द्वारेच करण्यात येईल. त्यासाठी Core Banking ची सुविधा असलेल्या बँकेतच खाते उघडणे बंधनकारक राहिल.

३१) ई-निविदा भरताना कोणतीही टंकलिखीत चूक झाल्यास, त्यानंतर सादर केलेल्या ई-निविदेमधील तपशिलामध्ये कोणतीही सुधारणा मान्य होणार नाही. वित्तिय दर हे सर्व निविदाकारांनी कागदपत्रांची तपासणी करुन काळजीपूर्वक नमूद करावेत त्यात बदल / सुधारणा करण्याची संधी दिली जाणार नाही.

३२) उद्योग विभागाच्या दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या खरेदी धोरणातील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ नुसार, निविदेच्या इष्टतम स्पर्धेला बाधा येवू नये म्हणून निविदेतील कोणत्याही बाबीकरिता बाजारभावापेक्षा/वाजवीपेक्षा कमी दर नमूद करू नयेत. वित्तिय दर सादर करताना निविदेतील कोणत्याही बाबीकरिता शुन्य दर नमूद केल्यास वा कोणत्याही बाबीचा रकाना "निरंक" ठेवल्यास सदरची निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. अशा प्रकारे शुन्य दर नमूद करणा-या तसेच कोणत्याही बाबीचा रकाना "निरंक" ठेवणा-या निविदाधारकास अपात्र ठरविण्यात येईल.

३३) निविदाधारकांकडे स्वतःच्या मालकीची (Ownership of vehicles) / वाहनपुरवठादार संस्थेच्या नावे किमान १० वाहने {५ सेडन वाहने व ५ एस. यु. व्ही. वाहने (उदा. इनोव्हा क्रिस्टा/फॉर्च्यूनर/ईर्टीगा इ.) व्यावसायिक परवान्याची (Transport Permit) असावीत. अशी वाहने निविदाधारकांच्या स्वतःच्या किंवा वाहनपुरवठादार संस्थेच्या नावे असल्याचा पुरावा म्हणून प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे RC बुक झेरॉक्स तांत्रिक लिफाफ्यासोबत सादर करावे.

३४) सोबतच्या नमुना करारपत्राप्रमाणे यशस्वी निविदाधारकास विभागीय आयुक्त यांच्या सोबत करारनामा करणे बंधनकारक राहिल.

३५) या ई-निविदेसंदर्भातील किंवा दर करारा संदर्भातील उद्भवणारे कोणतेही दावे अथवा मा. न्यायालयीन प्रकरणे सक्षम मा. न्यायाधिकरणामध्ये चालविता येतील.

३६) वाहन पुरविण्यासाठी निविदाकाराची अंतिम निवड करण्याचा अधिकार शासनाचा राहील.

३७) निविदाधारक / वाहनपुरवठादार संस्था यांच्या विरोधात कोणत्याही मा. न्यायालयामध्ये, किंवा कोणत्याही पोलीस ठाण्यात कोणताही खटला प्रलंबित नाही, याबाबतचे प्रतिज्ञापत्र (Affidavit) तांत्रिक लिफाफ्यासोबत जोडण्यात यावे.

३८) अति महत्वाच्या व्यक्ति (व्हि.आय.पी) व अति. अति. महत्वाच्या व्यक्ति (व्हि. व्हि.आय.पी) यांचा दौरा एका दिवसापेक्षा जास्त कालावधीकरिता असेल, त्यावेळी प्रत्येक वाहनाकरिता दोन वाहनचालक उपलब्ध करून देणे, वाहनपुरवठा संस्थेवर बंधनकारक राहिल.

३९) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:- संकीर्ण-२०२६/प्र. क्र.०६/२०२६/कोपा प्रशा-५ दिनांक ०६/०२/२०२६ अन्वये निश्चित केल्यानुसार शासकीय कार्यालयांकडून वापरण्यात येणा-या कंत्राटी सेवेच्या वाहनावर, वाहतुक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे कोणतीही वाहतुक दंड प्रलंबित नाही, असे प्रमाणपत्र देयक सादर करताना लिफाफ्यासह उपलब्ध करून देणे अनिवार्य राहील.

४०) निविदेत न्युनतम दर (एल-१) नमूद करणा-या पॅनलमधील पुरवठाधारकाकडून निविदा मूल्याच्या किमान ५०% देयकाची रक्कम होईल, इतक्या रकमेची वाहने प्राथम्याने भाड्याने घेण्यात येतील व तेवढी वाहने पुरविण्याबाबत एल-१ पुरवठाधारकाकडे मागणी करण्यात येईल. उर्वरित वाहने पॅनलमधील अन्य पुरवठादारांकडून घेण्यात येतील. मात्र, न्युनतम दरधारक (एल-१) यांनी त्यांच्याकडे मागणी केलेली वाहने पुरविण्यास नकार दिल्यास, त्या वाहनाकरिता निविदेत निश्चित केलेल्या भाड्याची रक्कम जितकी होईल, त्या रकमेचा उपरोल्लेखित ५०% देयकांमध्ये समावेश होईल व अशाप्रकारे ५०% देयकांच्या रकमेची गणना करण्यात येईल. (उदा. निविदा मूल्य रु. ३.०० कोटी असेल त्यावेळी न्युनतम दरधारकाकडून किमान रु. १.५० कोटी देयकाची रक्कम होईल इतक्या रकमेची वाहने भाड्याने घेण्यात येतील. उर्वरित रकमेची वाहने पॅनलमधील अन्य पुरवठादारांकडून घेण्यात येतील. मात्र, न्युनतम दर नमूद करणाऱ्या पुरवठादाराने वाहने पुरविण्यास नकार दिल्यास त्या वाहनांकरिता निश्चित केलेल्या भाड्याची संभाव्य रक्कम रुपये ५.०० लाख होणार असेल तर या रु. ५.०० लाख इतक्या संभाव्य रकमेचा रु. १.५० कोटी रकमेमध्ये समावेश असेल.)

४१) ज्या जिल्हयामध्ये मा. राज्य अतिथी यांचा दौरा असेल. अशा जिल्हयातील पुरवठादार पॅनलवर नसल्यास किंवा जिल्हयातील पुरवठादाराकडे योग्य वाहन उपलब्ध नसल्यास किंवा त्याने वाहन पुरविण्यास असमर्थता दर्शविल्यास किंवा आपत्कालिन परिस्थिती उद्भवल्यास मा. राज्य अतिथी यांच्या वर्दीसाठी नजिकच्या जिल्हयातील पॅनलमधील वाहन पुरवठादाराकडून भाडयाने वाहने घेण्यात येतील.

**करार लिहून देणार :-**

**मे. -----------------------------------**

**करार लिहून घेणार :-**

**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**